| MHSN110005532014 | नियमित फौजदारी खटला क्र.७३/२०१४<br>सरकार / पवन काळे व इतर |
|---|---|

## निशाणी ६३ खालील आदेश

आरोपी क्र.२ अजय पवार विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४५४, ३८० सह कलम ३४ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. आरोपी क्र.२ हा न्यायालयीन कोठडीत असून आरोपीच्या वतीने जामीन अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

२. आरोपीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, आरोपीला सदरचा गुन्हा मान्य नाही. आरोपीस अटक करुन न्यायालयीन कोठडीत पाठवले आहे. आरोपी लायक जामीन देण्यास तयार आहे. आरोपी हा त्याच्या घरातील एकमेव कर्ता पुरुष असून त्याच्यावर त्याच्या लहान मुलीची जबाबदारी आहे. आरोपीला जामीनावर मुक्त न केल्यास त्याच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येणार आहे. आरोपी जामीनावर सुटल्यास परागंदा होणार नाही. आरोपी न्यायालयात बिनचूकपणे उपस्थित राहण्यास तयार आहे. न्यायालय ज्या अटी व शर्ती देतील त्याचे काटेकोरपणे पालन करण्यास आरोपी तयार आहे. त्यामुळे, आरोपीला जामीनावर मुक्त करावे अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

३. सहा. सरकारी वकील यांनी सदर अर्जास म्हणणे देवून जामीन देण्यास हरकत घेतलेली आहे. त्यांनी असे नमूद केले आहे की, आरोपीवर तोहमत गुन्हा अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. आरोपीस जामीनावर सोडल्यास तो फरार होण्याची दाट शक्यता आहे. आरोपी सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर इतरही गुन्हे प्रलंबीत आहेत. आरोपी तारखांना हजर राहण्याची शक्यता नाही. आरोपी अशाच स्वरुपाचा

इतर गुन्हा करण्याची शक्यता आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज देखील नामंजूर करण्यात यावा अशी मागणी त्यांनी केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. प्रस्तुतचा गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र आहे. गुन्ह्याचे तपासकाम पूर्ण होवून सदरकामी दोषारोपपत्र दाखल झालेले आहे. त्यामुळे, सदरकामी आरोपीच्या कोठडीची आवश्यकता दिसून येत नाही. आरोपी घालून दिलेल्या अटींचे पालन करण्यास तयार आहे. अशा परिस्थितीत आरोपीला न्यायालयीन कोठडीत ठेवून त्याचे व्यक्तीस्वातंत्र हिरावणे मला न्यायोचित वाटत नाही. त्यामुळे, योग्य त्या अटी व शर्ती लादून आरोपीला जामीनावर मुक्त करणे योग्य होणार आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करते.

## आदेश

१. आरोपी क्र.२ अजय पवारचा जामीन अर्ज खालील अटींवर मंजूर करण्यात येतो.

अ. आरोपीने रक्कम रुपये २५,०००/– च्या वैयक्तीक व तितक्याच रकमेच्या जामीनदाराच्या बंधपत्रावर अनुसरुन मुक्त करण्यात येते.

ब. आरोपीने नेमून दिलेल्या तारखेस या न्यायालयात बिनचुकपणे हजर रहावयाचे आहे.

क. आरोपीने त्याच्या जवळच्या दोन नातेवाईकांचे नाव, पत्ता व मोबाईल नंबर दाखल करावेत.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.10.15 17:58:12 +0530

आटपाडी

दिनांक : १५/१०/२०२५

(अ. जो. बाचुळकर)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 15/10/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 15/10/2025 |
| Order uploaded on | : | 15/10/2025 |